# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक २२.०८.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नंदनवन पोलीसांची कामगिरी :– घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १५.०८.२०२६ चे १२.०० वा. ते दिनांक १६.०८.२०२६ चे २०.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत प्लॉट नं. ४५, घरसंसार सोसायटी, गल्ली नं. ३, वाठोडा रोड, नागपूर येथे राहणारे फिर्यादी गणेश तुळशिराम कद्रे, वय ५६ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह सालबर्डी येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी–कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, लोखंडी कपाटाचे कुलुप तोडुन त्यातील रोख ३,५०,०००/–रू. तसेच, सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ७,०१,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात नंदनवन पोलीसांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपीस निष्पन्न केले. आरोपीचा शोध घेतला असता, तो मिळुन येत नव्हता. दिनांक २१.०८.२०२६ रोजी पोलीस नियंत्रण कक्षाकडुन सुचना मिळाली की, कुंभारटोली चौकात एक ईसम शस्त्रासह धुमधाम करीत आहे. अशा प्राप्त सुचनेवरून तेथुन निष्पन्न ईसमास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे ताब्यातील दुचाकी गाडीची झडती घेतली असता, गाडीचे डिक्कीमध्ये एक लोखंडी चाकु व तीन लाख रूपये रोख स्वरूपात मिळुन आले. आरोपीस त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव आकाश विलास लांजेवार, वय २७ वर्षे, रा. शास्त्री नगर, जुनी कुंभारटोली झोपडपट्टी, नंदनवन, नागपूर असे सांगीतले. रकमेबाबत विचारले असता, त्याने वर नमुद घरफोडी केल्याची कबुली देवुन, त्यातील रक्कम असल्याचे सांगीतले व गुन्ह्यातील चोरी केलेले दागिणे दोन सोनारांना विकल्याचे सांगीतले. आरोपीस गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. आरोपीचे ताब्यातुन रोख ३,००,०००/–रू. व एका सोनाराकडे विकलेले दागिण्यांची ९ ग्रॅम ९०० मि.ग्रॅ. सोन्याची लगड, व ॲक्टीवा मोपेड क्र. एम.एच. ४९ बिसी २४३४ असा एकुण ४,८०,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), नागपुर शहर, मा. श्री. रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. रोशन पंडीत, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग), वपोनि. कैलास देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. उमाकांत राठोड, पोउपनि. संतोषकुमार रामलोड, पोहवा. दिनेश जुगनाहाके, पोअं. प्रविण मरापे, राहुल खडतकर, सोमेश्वर घुगल, हिमांशु पाटील, अभिषेक पांडे व मपोहवा. स्वाती कुमरे यांनी केली.




**२) जरीपटका पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २२.०८.२०२६ चे ००.१९ वा. ते ०३.४५ वा. चे दरम्यान, जरीपटका पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत, पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, पहेलवान शहा दर्गाह जवळ, मोतीबाग रेल्वे क्रॉसिंग, जरीपटका येथे तीन ईसम बॅग घेवुन उभे आहे व त्यांचेजवळ अंमली पदार्थ आहे. अशा माहीतीवरून नमुद ठिकाणी गेले असता, मिळालेल्या वर्णनाचे तीन ईसम दर्गाहजवळील एका तंबुमध्ये दिसुन आले. त्यांना त्यांची नावे विचारली असता, त्यांनी आपली नावे १) प्रकाशचंद्र चतुर्भुज मेहेर, वय २९ वर्षे, रा. पलाश (माईचाल), तह. जुनागड, जि. कलाहांडी (ओडीसा), २) बिबेक सुशिल मेहेर, वय २२ वर्षे, रा. नक्टीगुडा, तह. जुनागड, जि. कलाहांडी (ओडीसा), ३) गोपीनाथ चमारा लहजल, वय २४ वर्षे, रा. बलभिलयामला, तह. जुनागड, जि. कलाहांडी (ओडीसा) असे सांगीतले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करून, पंचासमक्ष त्यांची व त्यांचे जवळील बॅगेची झडती घेतली असता, त्यांचे बॅगेत ०३ सिलबंद पॅकेटमध्ये अंमली पदार्थ हिरव्या रंगाचा गांजा एकुण वजनी २७ किलो ५४५ ग्रॅम मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन गांजा, ०३ मोबाईल फोन, बॅग असा एकुण ६,२२,४००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), २०(ब), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे जरीपटका येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. सत्यविर बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अनिल ताकसांडे, सपोनि. आशिष मोरखडे, पोउपनि. देवचंद सहारे, पोहवा. रमेश यादव, पोअं. पंकज वरकडे, मंगेश दोनाडकर, नितेश नागपुरे व मुकुंद सुर्यतळ यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे यशोधरानगर :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २२.०८.२०२६ चे ०७.२० वा. ते ०८.०० वा. चे दरम्यान, यशोधरानगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माझरी नाला, नाका नं. २ कडे जाणाऱ्या निर्जनस्थळावर एका दुचाकी गाडीवर तिन ईसम संशयीतरित्या दिसल्याने, त्यांचेकडे जात असतांना ते पोलीसांना पाहुन पळु लागले. त्यांचा पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांना त्यांची नावे व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव १) निलेश मुरलीधर बावणे, वय २१ वर्षे, २) शेख मोईनुद्दीन उर्फ रहीम शेख करीम, वय २३ वर्षे, दोन्हीही रा. वनदेवी नगर झोपडपट्टी, यशोधरानगर, नागपूर ३) मोहम्मद कैफ हसमुद्दीन अन्सारी, वय २१ वर्षे, रा. बंगालीचे घराजवळ, हस्तीनापुर, कळमना, नागपूर असे सांगीतले. त्यांची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, आरोपी क्र. २ चे कंबरेत एक लोखंडी चाकु व ३ चे ताब्यात एक स्टील चा चाकु असे एकुण ०२ चाकु मिळुन आले. आरोपीचे ताब्यातुन ०२ चाकु व टीव्हीएस कंपनीची दुचाकी असा एकुण किंमती १,०२,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हे कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्यांनी मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपींविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १७.०८.२०२६ चे १०.०० वा. ते दिनांक २२.०८.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट कं. ३५, बोकडे ले—आऊट, किरणापुर, हुडकेश्वर रोड, नागपूर येथे राहणारे फिर्यादी अमीत नंदु खरवडे, वय ३४ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह बहीणीचे घरी मनिषनगर येथे मुक्कामी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे खिडकीचे काच फोडुन लोखंडी ग्रील कापुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ७०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ४,००,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. प्रविण वाकडे ७५८८५३७१९२ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३१३०४७८ /२००५ | कलम ३३६, ४२७, ३४ भा.दं.वि. | १) रितेश मनोहरराव दुरूगकर, वय २१ वर्षे, रा. प्लॉट नं. २, कब्रस्तान जवळ, चंदननगर, ईमामवाडा, नागपुर. २) राजेश उर्फ राजा सुरेश गुंड, वय २१ वर्षे, रा. प्लॉट नं. | २५.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ५०९, कुबडेचे घरी किरायाने, चंदननगर, ईमामवाडा, नागपुर.<br>३) शिवप्रसाद उर्फ गोल्या भोजराज बागडे, वय २२ वर्षे, रा. आशाबाई दुरूगकर चे घरी, चंदननगर, ईमामवाडा, नागपुर. | |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**